**सं.फौ.ख.क्र. ५४३/२०२३**

**प्रकाश काळे –वि– गौतम संकलेचा**

**निशाणी क्र. १८ खाली.**

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १ प्रकाश पूंडलिक काळे यांचा शपथेवर उर्वरित उलटतपास आरोपीचे विधिज्ञ श्री. ए. टी. देवरे यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

१२. आरोपीला मी रक्कम रुपये ५,००,०००/– व र.रु. १०,००,०००/– दिले तेव्हा केवळ मी व आरोपी असे दोघेच होतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीसोबत मी जे तोंडी व्यवहार केले. त्यावेळी माझ्या घरातील कोणीही हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलाला तोंडी व्यवहाराबाबत मीच माहिती दिली. त्यावेळी तो प्रत्यक्ष हजर नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी शिक्षक असल्यामुळे प्रत्येक वर्षी मला आयकर भरावा लागत होता.

**प्रश्न–** तुमचा शिक्षक म्हणून जो पगार येत होता त्याबाबत व इतर मिळकतींच्या व्यवहारातून तुम्हाला जे उत्पन्न मिळायचे त्या सर्वाबाबत तुम्ही आयकर भरत होता?

**उत्तर–** मी केवळ माझा जो पगार येत होता त्याचे आयकर भरत होतो. इतर उत्पन्नाचे आयकर भरत नव्हतो.

१३. मी आरोपीला जे पाच लाख रुपये व दहा लाख रुपये दिले होते त्याचे आयकर भरले होते किंवा कसे ते मला सांगता येणार नाही. मी आरोपीला जे पाच लाख रुपये व दहा लाख रुपये दिले त्याचे आयकर भरल्याचे कागदपत्र मी दाखल करणार नाही. आरोपीने माझ्याकडून कोणत्या तारखेला रक्कम घेतली ती निश्चित तारीख मला सांगता येणार नाही. आरोपीने र.रु. दहा लाख माझ्याकडून दि.२७.०१.२०२२ रोजी घेतले.

१४. आरोपीला मी ज्यादिवशी रकमा दिल्या त्यादिवशीच त्याच्याकडून सिक्युरिटीपोटी चेक घेतले असे काही घडले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या रकमेसाठी आरोपीकडून सिक्युरिटीपोटी चेक घेतला नाही व कोणताही कागद

लिहून देखील घेतला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला जेव्हा मी पैसे दिले तेव्हा मी त्याच्याकडून उसनवार पावती देखील लिहून घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला मी बँकेतून पैसे काढून तात्काळ दिले हे दाखवणारे कोणतेही कागदपत्र प्रस्तुतकामी दाखल केले नाही.

१५. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींचे किराणा मालाचे दुकान असल्यामुळे मी नेहमी त्यांच्याकडून किराणा माल घ्यायचो व त्यानुसार आमच्यात देवाण–घेवाण चालत होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी कधी–कधी मला उधारीने देखील माल द्यायचे. आरोपी मला जो किराणा माल द्यायचे त्याबाबत ते टिप्पण ठेवायचे किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत माझे मित्रत्वाचे संबंध असल्यामुळे मी त्यांच्या दुकानाच्या काऊंटरवर देखील बसत होतो. आरोपीचे इतर व्यापाऱ्यांशी चेकने व्यवहार व्हायचे किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींसोबत माझा कोणताही व्यवहार नसतांना मी आरोपींच्या दुकानातून एक कोरा चेक घेतला व तो माझ्या मुलाने भरुन बँकेत जमा केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडून माझे कोणतेही घेणे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुद्ध सदरचे प्रकरण कायदेशीर तरतुदीनुसार दाखल केलेले नाही.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.05.05 17:30:39 +0530

**दिनांक – ०५/०५/२०२६**
**ठिकाण –चांदवड.**

**( वृषाली दी. सुंगारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**
**क.स्तर, चांदवड**